# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका, नागपूर शहरातील नव्याने हद्दवाढ झालेल्या
**{ डीपीडीसी }** मौजा नरसाळा अंतर्गत शिव मंदीर ग्राऊंड स्वागत नगर, येथे बास्केट बॉल कोर्ट चे विकास करण्याच्या कामास मा. आयुक्त यांनी दि. 19/06/2025 रोजी रु. 1,09,71,734/- राशीच्या प्राकलणास मंजुरी प्रदान केलेली आहे. त्या कामास क्रिडा व सांस्कृतिक विभागाचे प्रावधान प्राप्त आहे.

करीता रु. 1,09,71,734/- राशीला प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**टिप:-** 1) सदर कामास क्रिडा व सांस्कृतिक विभागाचे पदशिर्ष A46101373208 अंतर्गत 2025- 26 चे आर्थिक वर्षात रु. 1,09,71,734/- प्रावधानास मंजुरी प्राप्त आहे.
2) सदर कामाकरीता मा. अधिक्षक अभियंता यांची रु. 97,56,324/- राशीला दि. 06/06/2025 रोजीची तांत्रीक मंजुरी प्राप्त आहे.
3) विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 146/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 26/06/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (डीपीडीसी), डीपीडीसी विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूर शहरातील नव्याने हद्दवाढ झालेल्या मौजा नरसाळा अंतर्गत शिव मंदीर ग्राऊंड स्वागत नगर, येथे बास्केट बॉल कोर्ट चे विकास करण्याच्या कामास मा. आयुक्त यांनी दि. 19/06/2025 रोजी रु. 1,09,71,734/- राशीच्या प्राकलणास मंजुरी प्रदान केलेली आहे. त्या कामास क्रिडा व सांस्कृतिक विभागाचे प्रावधान प्राप्त आहे.

करीता रु. 1,09,71,734/- राशीला प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.